# नारायणा फार्मर्स प्रोडयुसर कंपनी लिमिटेड

CIN No. :- U01100MH2021PTC364428

**गट नंबर ३३५ , साकुर , घोटी सिन्नर हायवे , साकुर फाटा ,**
**तालुका इगतपुरी , जिल्हा नाशिक ,४२२५०२**



# ध्येय

सर्व उत्पादक शेतकरी सभासद यांना शासकीय-खाजगी योजनांचा लाभ मिळवून देणे त्यांचे उत्पादन/उत्पन्न वाढविणे आणि शेतकऱ्यांच्या उत्पादनाला जास्तीत जास्त भाव/नफा मिळवून देणेसाठी प्रक्रिया उद्योग उभे करुन शेतकऱ्यांना आर्थिक, सामाजिक , मानसिक शारीरीक स्थरावरती आधार देऊन सक्षम करणे





# नारायणा फार्मर्स प्रोडयुसर कंपनी लिमिटेड

मनोगत

सन्माननीय शेतकरी बंधु-भगिनींनो,सप्रेम नमस्कार!सर्व शेतकरी बांधवांना आनंदाची बातमी. शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी आणि तरुणांच्या हाताला रोजगार मिळावा म्हणून आपण 'नारायणा फार्मर्स प्रोडयुसर कंपनी लिमिटेड' या शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना केली आहे. यामध्ये सक्षम सरकारी नियंत्रण यंत्रणा, शेतकरी मालकी आणि शेतकरी हितार्थ कडक कायदे आणि सुयोग्य अंमलबजावणी आदींचा संगम साधून नारायणा फार्मर्स प्रोडयुसर कंपनी लिमिटेड या उत्पादक शेतकर्यांच्या नोंदणीकृत कंपनीची नोंदणी झाली आहे. शेतकर्यांना आर्थिक सामाजिकसक्षम करणे हे ध्येय नारायणा फार्मर्स प्रोडयुसर कंपनीचे आहे. उत्तर  महाराष्ट्रात प्रामुख्याने आपल्या ईगतपुरी तालुक्यात सोयाबीन, कांदा, ऊस, भात, भाजीपाला आणि दुध हे प्रमुख शेती आणि शेती पूरक उत्पादन आहे. या ठिकाणी सर्व जीवनमान सोयाबीन, कांदा, ऊस , भात ,भाजीपाला आणि दुध उत्पादनावर आधारित आहे. सोयाबीन,कांदा, ऊस , भात , भाजीपाला हे नगदी पीक तसेच दुध हे शेतीपुरक नगदी नफा मिळवून देणारे उत्पादन आहे. या पिंकांचे उत्पादन जेवढे जास्त तेवढीच त्याच्या उपपदार्थांची मागणी देखील आहे. त्याच बरोबर सोयाबीन,कांदा, ऊस , भात ,भाजीपाला आणि दुध कच्च्यामालावर प्रक्रिया करुन यापासून निर्यातक्षम खाद्य पदार्थ निर्मिती करणे व त्यांची राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय बाजारात विक्री करुन शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नफा, हमीभाव मिळवूण देण्याचे मुख्य उद्दिष्ट कंपनीचे आहे.पारंपारिक पदार्थांपेक्षा आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने सोयाबीन,  कांदा, ऊस ,भात , भाजीपाला  व दुधापासून नवीन खाद्य पदार्थ निर्मिती करणे ज्याची किंमत आणि मागणी राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय बाजारात जास्त आहे. हे ध्येय उराशी बाळगून कंपनी कार्य करित आहे. केंद्र शासन, राज्यशासन कृषी विभाग आणि सर्व यंत्रणा या शेतकर्यांच्या विकासासाठी नवनवीन योजना आणतात खऱ्या, पण प्रशासकीय अनास्था, राजकीय दबाव यामुळे त्या शेवटच्या शेतकर्यांपर्यंत पोहचत नाहीत. यापुढचे शेतकरी कृषी धोरण हे शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून सर्व शेतकरी हिताच्या शासकीय आणि खाजगी योजना शेतकऱ्यांना मिळवून देणे असे आहे.

शेतकरी सक्षमीकरण हेच धोरण नारायणा फार्मर्स प्रोडयुसर कंपनीचे असलेने प्रशासन आणि कामगार भरतीमध्ये सभासद आणि त्यांच्या कुटुंबियांना संधी दिली जाणार आहे. तसेच नियमित लाभांश, बोनस वाटप अनिवार्यपणे केले जाणार आहे. यासाठी आपण नारायणा फार्मर्स प्रोडयुसर  कंपनीचे सभासद असणे गरजेचे आहे.आमच्या सर्व उपक्रमांना आपण सर्वोतोपरी सहकार्य केले आहे. आपला विश्वास आणि सहकार्य यावर शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवून शेतकऱ्यांना सक्षम करण्याचे ध्येय पुढे नेण्यासाठी आणि आपल्या क्रण आणि प्रेमातुन उतराई होण्यासाठी शेतकर्यांच्या आर्थिक सामाजिक प्रगतीसाठी, परिवर्तन आणि नवननिर्मितीसाठी, आम्ही आपणास आवाहन करतो की, आपण नारायणा फार्मर्स प्रोडयुसर कंपनी लिमिटेड. या शेतकरी उत्पादक कंपनीचे शेअर्स घेऊन सभासद व्हावे व आपला सर्वांगिण विकास साधावा.

श्री. बाळासाहेब विष्णु पावसे  
चेअरमन  
नारायणा फार्मर्स प्रोडयुसर कंपनी लिमिटेड

# उद्दिष्ट्ये

- उत्पादक शेतकरी संभासदांना आर्थिक , सामाजिक, मानसिक व शारीरिक सक्षम करण्याच्या हेतूने आधुनिक पध्दतीने मोठ्याप्रमाणावर शेतीच्या उत्पादनाचा जास्तीत जास्त फायदा मिळवून देण्याच्या दृष्टीने शेतीविषयक सुधारलेल्या पध्दतीचा अवलंब करणे आणि सामूहिक तत्वावर शेती करण्याची पध्दत अंमलात आणून सभासदांमध्ये शेतीची, शेतकी उद्योग व जोडधंद्याची सामूहिक तत्वावर योग्यरितीने वाढ होण्यास सक्रीय उत्तेजन देणे व सहाय्य करणे हा कंपनीचा मुख्य उद्दिष्ट आहे.
- उत्पादक शेतकरी सभासदांनी पुरविलेल्या सोयाबीन, कांदा, ऊस ,भाजीपाला व दुधावर प्रक्रिया करुन त्यापासून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारात जास्तीत जास्त मागणी आणि किंमत असणारे उपपदार्थ निर्मिती करणे व त्यांची विक्री करणे.
- सोयाबीन, कांदा, ऊस ,भात ,भाजीपाला व दुधावर मोठ्या प्रमाणावर प्रक्रिया करणेसाठी प्रक्रिया युनिट उभारणे व ते कार्यक्षमतेने चालविण्यासाठी योग्य त्या सर्व बाबी हाती घेणे.
- उत्पादक शेतकरी सभासदांच्या कार्यक्षेत्रात पाणीपुरवठा योजना, शेती सुधारणा योजना, बी-बियाणे, खते, किटक नाशके वाटपाच्या शेती विकासाच्या योजना.व शेतकरी सक्षमीकरणाच्या योजना तयार करणे व राबविणे.
- उत्पादक शेतकरी सभासदांच्या सोयाबीन, कांदा, ऊस ,भाजीपाला व दूध उत्पादनाला जास्तीत जास्त किफायतीशीर भाव देणे.
- उत्पादक शेतकरी सभासदांना कमी भांडवलामध्ये जास्तीत जास्त नफा मिळवूण देण्यासाठी प्रयत्न करणे व नाविन्यपूर्ण योजना आखणे
- उत्पादक शेतकरी सभासदांना शेती विकासाच्या दृष्टीने वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण देणे व वेळोवेळी सल्ला आणि मार्गदर्शन करणे,
- सभासद शेतकर्यांच्या विविध ठिकाणी सहली आयोजित करुन त्यांना विकसित शेतकर्यांच्या यशोगाथा सांगणे व आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती करुन देणे
- कंपनीमध्ये रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या संधी प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून शेतकरी सभासदांच्या कुटुंबातील व्यक्तींसाठी निर्माण करणे
- सभासद शेतकरी कुटुंबाचे आरोग्य मूलभूत गरजा शिक्षण याबाबींवर वेळोवेळी मार्गदर्शन व आवश्यक ती मदत आणि तत्सम काही योजना कंपनी नजिकच्या काळात सभासदना देणार

# कंपनी माहिती

**PAN NO**

AAHCN7133P

**CIN NO**

U01100MH202
1PTC364428

**TAN NO**


NSKN06379C

INDIAN BANK | Account No :- 7057841685 | IFSC Code :- IDIB000P098

# शेअर्स धारकांना देण्यात येणारे लाभ

- शेतमालावर प्रक्रिया करून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांत पाठवणे
- शेती माल निर्यात करुन शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नफा वाटप
- शासकीय व खाजगी सर्व योजनांचा माहिती व लाभ
- कंपनीच्या विविध प्रोडक्टच्या खरेदीवर भरघोस सवलत
- सेंद्रिय शेती मार्गदर्शन व तसेच सेंद्रिय शेती प्रमाणन करणार
- क्रेडिट तत्वावर शेती मशागत सुविधा पुरवठा
- छोटे, मध्यम स्वरुपाचा कर्जपुरवठा
- बी-बियाणे, औषधे, खतांचा सवलतीत पुरवठा
- कंपनी व्यवस्थापन आणि कामगार भरतीमध्ये सभासद आणि त्यांच्या कुटुंबियांना प्रधान्य
- सभासद शेतकरी कुटुंबाना आरोग्य शिक्षण यावर मार्गदर्शन

# सभासद



**सभासद होण्यासाठी लागणारी कागदपत्रे**

१) आधार कार्ड
२) फोटो (२ प्रती)
३) ७/१२ व खाते उतारा
(स्वत:चा किवा रक्तातील नात्यातील व्यक्तीचा)
४) बँकेचं माहिती पासबुक / चेकबुक
५) पॅनकार्ड

सर्व इच्छूक शेतकरी, नागरिक आणि बंधू भगिनींनो, आपल्या नारायणा फार्मर्स प्रोडयुसर कंपनी लिमिटेड या शेतकरी उत्पादक कंपनीचे सभासद नोंदणी फी रुपये ५०० /- ( रुपये पाचशे मात्र ) आहे, सदर रक्कम चेक / डी.डी./ एन.ई.एफ.टी./ इंटरनेट बँकिंगद्वारे कंपनीच्या खात्यावर जमा करावी. पारदर्शकता असावी यासाठी रोख रक्कम स्विकारली जाणार नाही. याची नोंद घ्यावी

# अधिक माहितीसाठी सपंर्क

Mob. No.+91 9890096100
Mob. No.+91 9960645828

**Phone Number**

narayanafarmers@gmail.com

**Email Address**

www.narayanafarmers.com

**Website**